# राष्ट्रीय सेवा योजना

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## नियमित व शिबिर अहवाल 2014-15

| | | |
|---|---|---|
| 1 | महाविद्यालयाचे नाव व पत्ता : | मविप्र समाजाचे, वाणिज्य व्यवस्थापन आणि संगणक शास्त्र महाविद्यालय, गंगापूर रोड नाशिक-422013 |
| 2 | प्राचर्यांचे नाव, फोन नंबर: | प्राचार्य एस.एन.शिंदे फोन नंबर:- 9673374999 |
| 3 | कार्यक्रम अधिकारी नाव, फोन नंबर: | प्रा.ए.के.मोगल फोन नंबर:- 8956693949 |

4 स्वयंसेवक संख्या (एकूण युनिट):- 59 अक्षरी:- एकोणसाठ

| Castewise | SC | ST | OTHER(OBC,NT,OPEN) | TOTAL |
|---|---|---|---|---|
| Male | 03 | 00 | 33 | 36 |
| Female | 04 | 01 | 18 | 23 |
| Total | 07 | 01 | 51 | 59 |

5 कार्यशाळा / शिबिर /व्याख्याने इत्यादि आयोजनात सहभागी शासकिय, निमशासकिय, स्वंयसेवी संस्था नाव व पत्ता , फोन नंबर:

1) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
2) डॉ वसंतराव पवार वैद्यकिय महाविद्यालय आडगाव,

नाशिक

6 **नियमित कार्यक्रम अहवाल:**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,राष्ट्रीय सेवा योजना यांचे वतीने सी.एम.सी.एस महाविद्यालयास सन 2014-2015 या
शैक्षणिक वर्षासाठी 50 स्वंयसेवकांचे एकक मंजुर करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एन.शिंदे
यांनी प्रा.अमित कारभारी मोगल यांची कार्यक्रम अधिकारी म्हणून नेमणुक केली आहे.
स्वंयसेवकांची नाव नोंदनी करुन उदबोधन वर्ग घेण्यात आला. प्रा मोगल यांनी एन.एस.एस चा इतिहासव
कार्यप्रणाली विशद करुन त्याचे फायदे व जीवनात यशस्वीतेसाठी एन.एस.एस कसे महत्वाचे आहे ते विशद केले.
मा.आयुक्त कुलवंत कुमार सरंगल व ना.जि.समन्वय मा.प्रा.एस.टी.घुले यांच्या हस्ते दि.9/12/2014 रोजी
रा.से.यो उदघाटन झाले. म.वि.प्र.संस्थेचे चिटणिस व एल.एम.सी मेंबर मा.डॉ सुनिल ढिकले कार्यक्रमाचे अध्यक्ष
म्हणुन उपस्थित होते. हिवाली श्रमसंस्कार शिबीराची प्राथमिक नियोजन बैठक दि.12/12/2014 आयोजित करण्यात
आली.दि.15.12.2014 ते 21.12.2014 दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबीर तिर्थक्षेत्र त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक येथे
झाले. शिबीरात एकून 25 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला शिबीरात त्र्यंबकेश्वर येथे स्वच्छता अभियान जनजागृती मोहीम
स्वच्छता रॅली राबविण्यात आली.
दि.12 जानेवारी 2015 रोजी स्वामी विवेकानंद जयंती निमित्त पोलीस निरीक्षक वैशाली शेंडे यांचे व्याख्यान
आयोजित करण्यात आले.त्यांनी राष्ट्र घडणीत युवकांचा सहभाग या विषयावर मार्गदर्शन केले. दि.12 जाने 2015 ते
दि.19 जाने 2015 हा संपूर्ण सप्ताह म्हणून साजरा करण्यात आले. सर्व स्पर्धा आयोजनात स्वंयसेवकांनी सक्रिय
सहभाग नोंदवला. दि.17 जानेवारी रोजी वाहतुक विभाग पो.नि.शैलेश जाधव यांचे सुरक्षा विषयी व्याख्यान झाले.
मुल्यशिक्षण कार्यशाळा, मखमालाबाद येथे 12 स्वंयसेवकांनी सहभाग नोंदवला सदर कार्यशाळेत प्रा.अमित
मोगल यांनी सदर कार्यशाळेत मुल्यशिक्षण व आजचा युवक या विषयावर मार्गदर्शन केले. मुल्यशिक्षण

कार्यशाळा,सातपुर येथे 08 स्वंयसेवकांनी सहभाग नोंदवला
मविप्र मॅरेथॉन स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या 25 स्वंयसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. दि. 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताकदिन साजरा करण्यात आला.त्या आयोजनासाठी स्वंयसेवकांचा मोठा सहभाग होता. दि.13 फेब्रुवारी रोजी महाविद्यालयात वृक्षारोपन कार्यक्रम संपन्न झाला.
दि.14 फेब्रुवारी ते दि. 20 फेब्रुवारी रा.से.यो. 80 वा ओरिएन्टेशन कार्यक्रम अहमदनगर महाविद्यलयात कार्यक्रम अधिकारी प्रा.अमित मोगल यांनी यशस्विरित्या पूर्ण केले.
संपूर्ण वर्षात महाविद्यलयतर्फे विविध उपक्रम राबवीन्यात आले त्यासाठी महाविद्यालयतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारि यांनी सहभाग नोंदवला.

7 नियमित कार्यक्रम करतांनाचे 4 फोटो सोबत

8 विशेष शिबिराचे ठिकाण (तालुका, जिल्हासहीत): त्र्यंबकेश्वर ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक

9. विशेष शिबिराची सहभागी स्वयंसेवक संख्या : 25 दिनांक: 15/12/14 ते 21/12/14

| Castewise | SC | ST | OTHER(OBC,NT,OPEN) | TOTAL |
|---|---|---|---|---|
| Male | 2 | 0 | 17 | 19 |
| Female | 0 | 1 | 5 | 06 |
| Total | 2 | 1 | 22 | 25 |

10. विशेष शिबिर अहवाल:

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,राष्ट्रीय सेवा योजना व म.वि.प्र.समाजाचे सी.एम.सी.एस.महाविद्यालय,नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने हिवाळी श्रमसंस्कार शिबीर मु.पो - त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे दि. 15 डिसेंबर 2014 ते 21 डिसेंबर 2014 या कालावधीत संपन्न झाले.शिबीरात 25 स्वयंसेवक ,1 कार्यक्रम अधिकारी व 1 शिपाई सहभागी झाले होते.

**पहिला दिवस** :- शिबीराच्या ठिकाणी उद्घाटनाची तयारी सुरू करून त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन येथे निवास व्यवस्था व जेवणाची तयारी केली. शिबीराचे उद्घाटन म.वि.प्र.समाज संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती.निलीमाताई पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून निर्मलग्राम निर्माण केंद्राचे अध्यक्ष श्री.श्रीकांत नावरेकर उपस्थित होते.त्र्यंबकेश्वर नगराध्यक्षा श्रीमती.अलकाताई शिरसाठ,म.वि.प्र.समाजाचे चिटणीस डॉ.सुनिल ढिकले, संचालक श्री.मुरलीधर पाटील,श्री.दिलीप पाटील तसेच त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे CEO श्री.नागरे साहेब,श्री.कैलास घुले,श्री.यादवराव तुंगार,प्राचार्य डॉ.दिलीप धोंगडे,डॉ.बी.जी.वाघ व प्राचार्य डॉ.एस.एन.शिंदे उपस्थित होते.सर्वांनी शिबीरासाठी शुभेच्छा देऊन स्वयंसेवकांनी उन्नतीसाठी काम करावे असा संदेश दिला.

**दुसरा दिवस** :- सकाळी प्रार्थना,व्यायाम व राष्ट्रीय सेवा योजना गीत सादर करून श्रमदान कार्यक्रमास कुशावर्त येथे गायधनी गल्ली परिसरात स्वच्छता मोहीम राबविली तसेच तेथील नागरीकांना स्वच्छता कशी ठेवावी यासंदर्भात प्रबोधन केले.दुपारच्या सत्रात पोलीस निरीक्षक श्री.शैलेंद्र जाधव यांनी रस्तासुरक्षा व युवक या विषयावर व्याख्यान केले. अपघात व रस्ते ओलांडताना काय काळजी घ्यावी इ. संदर्भात आपण सर्वांनी जनतेपर्यंत पथनाट्य,संवाद साधुन प्रबोधन करावे असा संदेश दिला. श्री.भगवान सुर्यवंशी, शिक्षण उपसंचालक नाशिक यांनी शिक्षण आणि समाजजागृती या विषयावर व्याख्यान दिले. शिक्षणामुळे त्यांच्याबरोबरच त्यांचा परिवार विकसित होतो असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

**तिसरा दिवस** :-सकाळी प्रार्थना,योगासने व व्यायाम मखमलाबाद कॉलेजचे कार्य.अधिकारी प्रा.गोरक्षनाथ पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. के.टी.एच.एम.कॉलेज ज्युनियर विभागाचे कार्यकारी अधिकारी व विभागीय समन्वयक प्रा.अशोक सोनवणे, जिल्हा समन्वयक प्रा.एस.टी.घुले व कार्यक्रम अधिकारी प्रा.ए.के.मोगल यांच्या मार्गदर्शनाखाली सी.एम.सी.एस.महाविद्यालयाच्या कॉलेजच्या स्वंयसेवकांनी गोदावरी ,अहिल्या देवी नदी स्वच्छ करण्याचा निर्धार केला व तशी शपथ घेऊन श्रमदान कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.दुपारच्या सत्रात त्र्यंबकेश्वर येथील डॉ.सत्यप्रकाश शुक्ला यांनी युवक व समाज या विषयावर व्याख्यान दिले. रात्री सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

**चौथा दिवस**:- प्रार्थना रासेयो गीत व योगाचे महत्व याबददल प्रा.एस.टी.घुले सर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर

करुन अहिल्या देवी व गोदावरी नदी स्वच्छता अभियान कार्यक्रम सुरु करण्यात आला. दुपारच्या सत्रात दैनिक सकाळ संपादन प्रसारमाध्यमे व युवक या विषयावर व्याख्यान देउन प्रसार माध्यमात युवक कशाप्रकारे सक्रिय सहभाग घेउ शकतात याबददल सांगीतले सकाळ वर्तमानपत्रात स्वच्छता अभियानाची बातमी देउन विद्यापिठ व संस्थेला धन्यवाद दिले.

**पाचवा दिवस** :-सिडको महाविद्यालयातिल कार्यक्रम अधिकारी जिल्हा समन्वयक प्रा.एस.टी.घुले यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो गीतव प्रार्थना व व्यायाम घेण्यात आला. श्रमदान कार्यक्रमात गोदावरी, अहिल्या देवी नदी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. म.वि.प्र.सरचिटणिस श्रीमती.निलीमाताई पवार यांनी भेट देवून स्वच्छता मोहीमेचे कौतुक केले. रासेयो योजनेतिल सर्वांना पाहुन धन्यवाद दिलेव स्वंयसेवकांना शुभेच्या दिल्या तसेच कोणत्याही कामाची लाज न वाटता ती प्रामाणिक प्रमाने करावे असे सांगीतले दुपारच्या सत्रात जिल्हा पो.अधिक्षक श्री.संजय मोहीते यांनी राष्ट्र उभारणीत युवकांचे स्थान यास विषयांवर व्याख्यान झाले. पोलीस भरती प्रक्रियेत रासेयो ची महत्वाची भुमिका आहे. स्पर्धा परिक्षांमध्ये स्वंयसेवकांनी सहभागी घेण्याचे आव्हान केले रात्री त्र्यंबकेश्वर परिसरात पथनाट्याद्वारे जनजागृती केली. प्राचार्य एस.एन.शिंदे यांनी शिबीराला भेट देऊन स्वयंसेवकांसाठी केलेल्या व्यवस्थेची पहाणी केली व केलेल्या कामाचा आढावा घेतला. केलेल्या कामाचे कौतुक करुन समाजाप्रतीचे ऋण फेडण्यासाठी काम करा असा संदेश दिला.

**सहावा दिवस**:- रासेयो गीत प्रार्थना व्यायाम व योगासने झाल्यानंतर श्रमदान कार्यक्रमात अहिल्यादेवी नदी पात्रात ट्रॅक्टरमध्ये कचरा जमा करुन नदी पात्र स्वच्छ करण्यात आले.संपूर्ण नदीपात्र स्वच्छ झाल्यामुळे सर्वांनी आनंद व्यक्त केला व येणा-या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभुमीवर सेवा करण्याची संधी मिळाली याबददल प्रत्येकजणस्वत:ला धन्य समजत होता. गोदावरी अहिल्या या नदया आपले दैवत आहे. त्यांची स्वच्छता करणेहे प्रतेकाचे कर्तव्य आहे. परिसर,नदीपात्र सुंदर व स्वच्छ झाले. यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी व पर्यटकांनी समाधान व्यक्त केले. दुपारच्या सत्रात प्रा.अशोक सोनवणे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्यक्रमाबददल माहिती सांगीतली व संत गाडगेबाबा यांची पुण्यतीथी साजरी करुन त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.रात्री सांस्कृतिक कार्यक्रम स्वंयसेवकांनी सादर केला

**सातवा दिवस**:-शिबीराचा समारोप कार्यक्रमाची तयारी करण्यात आली. नाशिक विभागाचे महसुल आयुक्त श्री.एकनाथ डवलेसाहेब, श्री.पोपटराव पवार कार्यध्यक्ष आदर्श ग्राम. महाराष्ट्र राज्य राज्यसपर्क अधिकारी डॉ.अतुल साळुंखे विद्यापिठाचे समन्वयक डॉ.संजयकुमार दळवी, म.वि.प्र.सरचिटणिस निलिमाताई पवार, डॉ.तुषार शेवाळे,डॉ.बी.जी.वाघ,डॉ.दिलीप धोंडगे,श्री.कैलास घुले,श्री.एस.एम.नागरे साहेब,श्री.बहीरम साहेब इ.मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी स्वंयसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.हे शिबीर म.वि.प्र समाजाच्या शतक महोत्सवाचा एक भाग म्हणून शिबीर घेण्यात आले होते. श्रम व संस्काराचे महत्व पत्येकानी शिकले पाहिजे व सर्वांनी समाजासाठी, राष्ट्रासाठी आपले कर्तव्य पार पाडले व ते यशस्वी केले. याबददल सर्वांनी कौतुक केले व प्रशंसा केली सर्व कार्यकारी अधिकारी यांचे सर्वांनी आभार व्यक्त केले.

| | | |
|---|---|---|
| | टिप: अंदाजे मुल्यमापन रुपये : 25,000/- | |
| | रक्तदान विशेष एकूण सहभगी स्वयंसेवक संख्या : 51 | |
| | हिमोग्लोबिन तपासणी एकूण सहभगी स्वयंसेवक संख्या: 51 | रक्तदान एकूण बोटल्स संख्या: 33 |
| | वृक्षारोपण एकूण संख्या: 20 | एकूण बीजारोपण: 20 |

कार्यक्रम अधिकारी
PROGRAMME OFFICER
N.S.S.
Commerce, Management & Computer Science (C.M.C.S.) College, Nashik-422 013.

C.M.C.S. COLLEGE NASHIK 422 013

प्र.प्राचार्य
कॉमर्स, मॅनेजमेंट ॲंड कॉम्प्युटर सायन्स (सी.एम.सी.एस.) कॉलेज
नाशिक-४२२०१३.